ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

# महर्षी कर्वे यांनी केलेले विधवा उध्दार विषयक कार्य

**डॉ. दीपक गोविंद देशपांडे**

*प्राचार्य बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी. ता. – पलूस, जि. – सांगली*

*ईमेल आयडी :* dgd.deepak@gmail.com

**सारांश**

*म. कर्वे हे काळाच्या आधी जन्मलेले महाराष्ट्रातील एक थोर समाज सुधारक. अत्यंत हुशार असणा-या म. कर्वेना शिक्षण घेत असतानाच हिंदू धर्म-समाजातील अनेक वैगुण्ये लक्षात येऊ लागली होती. लहान वयात होणारी लग्न, लहान वयातच मुलींना येणारे वैधव्य पाहून म. कर्वे व्यथित होत असत. मात्र जेव्हा स्वत:च्या घरात बहिणीच्या वैधव्यामुळे म. कर्वे यांच्या मनामध्ये या प्रश्नाने एक मोठी जागा व्यापली. पुढे मित्राच्या बहिणीला वैधव्य प्राप्त झाल्या नंतर म. कर्वे यांनी आयुष्यात विधवा स्त्रियांच्या उध्दारासाठी काहीतरी कराचचे असा मनाशी निश्चय केला. याच दरम्यान बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय ते इश्वरचंद्र विद्यासागर आणि इतर बंगाली समाज सुधारकांचे विधवा आणि स्त्री शिक्षण विषयक सुरु असलेले कार्य म. कर्वे यांची या विषया संदर्भात मनोभूमिका पक्की करणारे ठरले. म. कर्वे यांनी समाजाला वेळ प्रसंगी प्रखर विरोध करुन विधवा स्त्रियांची अवस्था सुधारायची असा पण केला होता. अशातच म. कर्वे यांच्या पत्नी राधाबाईंचे निधन झाले. नातेवाईकांनी दुसरे लग्न करण्याचा तगादाच लावला आणि कर्वे यांनी विधवेशी विवाह करण्याचा आपला विचार प्रत्यक्षात आणला. या महाराष्ट्रातील पहिल्या विधवा विवाहानी महाराष्ट्र ढवळून निघाला. कर्वे यांना समाजानी बहिष्कृत केले, मात्र कर्वे मागे हटले नाहीत. त्यांनी बहिष्कार सहन केला मात्र आपल्या भूमिकेशी ते ठाम राहिले. पुढे समाजाला म. कर्वे यांच्या कार्याचे महत्व लक्षात येऊ लागले. म. कर्वे पुढे जिवंतपणीच एक दंतकथा बनले. भारत रत्न झाले. त्यांच्या कार्यानी हजारो विधवांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण आले. मी माझ्या शोध निबंधात म. कर्वे यांचा पूर्ण जीवनपट न घेता केवळ म. कर्वे यांनी केलेले विधवा उध्दार विषयक कार्याचीच थोडक्यात मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.*

**महत्त्वाचे शब्द** *: विधवा, समाज सुधारक, धर्म.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

## महर्षी कर्वे यांनी केलेले विधवा उध्दार विषयक कार्य

महर्षी कर्वे हे काळाच्या आधी जन्मलेले स्त्री-शिक्षणाचे आणि विधवांच्या जीवनाकडे अत्यंत गांभीर्याने पाहून विधवांच्या जीवनामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम करणारे थोर समाजसुधारक होते. म. कर्वे यांनी समाजातील अनिष्ट रुढी-परंपरा नष्ट करण्यासाठी त्या रुढींवर प्रहार करण्या ऐवजी त्या रुढींच्या विरोधात प्रत्यक्ष कृतीचा अवलंब केला. म. कर्वे यांनी एका विधवा स्त्रीशी विवाह केला आणि आपले संपूर्ण आयुष्य स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली करणे, निराधार विधवा स्त्रियांना आधार देणे हेच आपले जिवित कार्य मानून विधवांच्या उन्नतीचे प्रचंड मोठे काम केलेले दिसते.

म. कर्वे यांनी ज्यावेळी विधवा विवाहाची संकल्पना मांडली त्यावेळी पुण्यात आणि म. कर्वे यांच्या कोकणात (कर्वे) प्रचंड गहजब निर्माण झाला. पुण्यातील सर्व सनातनी मंडळींनी म. कर्वे यांना प्रखर विरोध करायला सुरुवात केली. म. कर्वे वृत्तीने अत्यंत संयमी, शांत, एकदा मनाशी केलेला विचार कोणत्याही परिस्थितीत पूर्णत्वाला न्यायचा या युक्तीने काम करणारे समाजसुधारक होते. त्यांनी त्यांची स्वत:ची दुर्दम्य इच्छाशक्ती, कमालीची सहनशीलता आणि शांतपणे कार्य करण्यासाठी लागणारी स्थिर बुध्दी या आधारावर अंगी आक्रमकता नसताना देखिल म. कर्वे अत्यंत सक्रीय आणि सफल समाजसुधारक होते हे उदाहरण देखील त्या काळात फक्त कर्वेपुरतेच मर्यादित रहावे यातच म. कर्वे यांचे मोठेपण सामावले आहे. (१)

म. कर्वेच्या आधी भारतीय समाजसुधारकां पैकी अनेकांनी विधवांच्या परिस्थितीबद्दल चर्चा केलेली होती. त्यात बंगालकडचे काही सुधारक आणि महाराष्ट्रामध्ये पंडीता रमाबाई, न्या, रानडे (जे स्वत: आई आणि वडीलांच्या हट्टापोटी विधवेशी विवाह करु शकले नाहीत) न्या. रानडेंच्या पत्नी रमाबाई रानडे यांनी आपल्या पतीच्या प्रोत्साहनामुळे भरपूर शिक्षण घेतले आणि स्त्रियांच्यासाठी 'सेवासदन' संस्था सुरु केली. (२)

या अनेकांचे मोठे योगदान होतेच मात्र म. कर्वेनी विधवांच्या सुधारणांसाठी, शिक्षणासाठी आणि पुनर्विवाहासाठी आपले आयुष्य वेचले. म. कर्वे त्यांचे आत्मवृत्त Luking Back मध्ये म्हणतात, 'महाराष्ट्रात विधवांच्या शिक्षणाचा पाया घालण्याचे श्रेष्ठ कार्य पंडीता रमाबाई यांनी केले. संपूर्ण दक्षिणी समाजाने या कार्याबद्दल पंडीत रामाबाईंचे कृतज्ञ राहीले पाहीजे अशी पराक्रमी स्त्री हिंदुस्थानात काय पण या भूतलावर देखील हाताच्या बोटावर मोजण्या इतकी सुध्दा मिळणार नाहीत.(३)

पं. रमाबाई यांची शारदा सदन १८९० मध्ये पुणे, पुढे केडगांव येथे स्थलांतरित झालेली, विधवांच्या शिक्षणासाठीचा हा महाराष्ट्रातील पहिला प्रयोग होता. म. कर्वे या शारदासदन प्रयोगाकडे आकर्षित झाले आणि त्यांनी विधवांच्या प्रश्नात लक्ष घालायचे ठरवले. १८८७ मध्ये बंगालमध्ये बाबू शशीपाद बॅनर्जी यांनी विधवा शिक्षणाचा प्रयत्न कोलकत्या जवळ बरानगर येथे केला होता. त्या शाळेत तीन मुली शिकत होत्या. बॅनर्जी यांनी युरोपियनांच्या आश्रयांनी ही शाळा १५-१६ वर्षे चालवली मात्र पुढे आर्थिक प्रश्न आणि मनुष्यबळा अभावी संस्था बंद झाली. मद्रामध्ये देखील वीरेश लिंगम पंतलु यांनी विधवागृह सुरु केले. तेथे चार मुल प्रवेशित होत्या मात्र हा प्रयोग देखील अल्पजीवी ठरला आणि संस्था बंद झाली. (४)

म. कर्वे महाविद्यालयात शिकत असतानाच त्यांच्या मनात भारतीय समाजांनी विधवा स्त्रियांशी, त्यांच्या आयुष्याशी केलेला अत्यंत चूकीचा उपचार थांबला पाहिजे या विचारची गाठ मनाशी बांधली. म. कर्वेना प्रखर विरोध पुण्यात देखील सुरु झाला मात्र या विरोधाकडे लक्ष न देता विधवा स्त्रियांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी जे शक्य आहे ते म. कर्वेनी केले आणि त्यातून विधवांचे जीवन चांगल्या अवस्थेत आणण्याचे अवघड कार्य त्यांनी यशस्वी केले.

म. कर्वे यांनी १८९३ साली आपल्या जीवलग मित्राच्या नरहरपंत जोशी यांची बहिण गोदुताई हिच्याशी लग्न केले. गोदुबाई ही शारदासदन या विधवागृहातील पहीली विद्यार्थीनी होय. म. कर्वेनी लग्नानंतर तिचे नांव आनंदीबाई ठेवले. आनंदीबाईनी म. कर्वेच्या कार्यात शेवट पर्यंत सहकार्य दिले. म. कर्वेनी केलेला हा पुण्यामध्ये जाहीरपणे झालेला पहिला विधवा विवाह होता. म. कर्वे यांच्या या विवाहाला थोर समाज सुधारक गो. ग. आगरकर उपस्थित होते. या विवाहानी विधवाविवाहाची दारे खुल झाली. म. कर्वे यांनी आधी विधवेशी विवाह करुन प्रथम केले आणि मग सांगितले या न्यायानी आपल्या कार्याला सुरुवात केली. (५)

लग्नानंतर म. कर्वे यांनी आधी केलेल्या नियोजनाप्रमाणे डिसेंबर १८९३ मध्ये 'विधवा विवाहोत्तेजक मंडळी' या संस्थेची स्थापना करुन विधवांना

शिक्षण देण्याचे काम देखील सुरु केले.(६) म. कर्वेनी पुण्यात १८९६ साली 'अनाथ बालिकाश्रम' ची स्थापना केली. या कार्यासाठी म. कर्वे यांनी स्वत: १०००/- रुपयांची देणगी दिली आणि ५०००/- रु. ची विमा पॉलीसी ट्रस्टींच्या नांवे करुन दिली.(७) आज या आश्रमांचे देणगीदार संपूर्ण भारतभर पसरलेले आहेत. प्लेगच्या साथीत ही संस्था इ. स. १९०० मध्ये हिंगणे येथे स्थलांतरीत झाली.

अनाथ बालिकाश्रम स्थापन केल्यामुळे झालेला सर्वात मोठा फायदा म्हणजे म. कर्वे यांनी विधवावर्गाच्या अंत:करणात आशेचा नवा अंकुर उत्पन्न केला. म. कर्वे यांनी हिंदू धर्मातील ज्या-ज्या जातीत विधवाविवाह रुढ नाही त्या-त्या जातीतील अल्पवयस्क विधवांना शिक्षण देऊन त्यांची मने सुशिक्षित करुन त्या विधवांना आर्थिक दृष्टिकोनातून स्वावलंबी बनवण्याचे आणि त्यांच्यात जगण्याचा आत्मविश्वास निर्माण करणे हे आश्रमाचे उद्देश आहे असे म. कर्वे म्हणत (८)

म. कर्वे यांनी अहोरात्र स्त्री शिक्षण, विधवांच्या जीवनात आनंद निर्माण करणे, विधवांना आर्थिक स्थिरता निर्माण करुन देणे या कार्यावर काम सुरु केले होते. म. कर्वे यांनी १९०७ मध्ये महिला विद्यालयाची स्थापना पुण्याजवळच्या हिंगणे या छोटया खेडयात (आताचे कर्वेनगर) केली. या आश्रमाचे यश म्हणजे पार्वतीबाई आठवले, श्रीमती येणुताई नामजोशी, काशीबाई देवधर, यमुनाबाई साने, कमलाबाई गरुड, रमाबाई सोमण इ. ना आश्रमाचा आसरा मिळून त्या सर्वजणी शिक्षण घेऊन स्वावलंबी झाल्या. शारदासदनची पहिली विद्यार्थिनी गोदुबाई हिचा म. कर्वे यांच्याशी पुर्नविवाह झाल्यानंतर शारदासदनातून बाहेर पडलेल्या काशिबाई देवधर, वेणुताई नामजोशी आणि स्वत: गोदुबाई यांनी म. कर्वेंच्या कार्याला मोठा हातभार लावला.(९) आश्रमासाठी काम करणा-या सर्व स्त्रिया ब्राहमण होत्या. विधवा, परित्यक्ता होत्या. समाजाने वाळीत टाकलेल्या या स्त्रियांनी म. कर्वेंच्या आश्रमाचे काम अत्यंत आस्थेने चालवले. स्त्री जीवनाच्या स्वतंत्र गरजा लक्षात घेवून स्त्रियांसाठी स्वतंत्रपणे उच्च शिक्षणाची सोय करावी असे म. कर्वे यांना वाटू लागले. मातृभाषेतून शिक्षण, गरजेपुरते इंग्रजी, स्त्रियांसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम ज्यामध्ये गृहविज्ञान, समाजशास्त्र, मानसशास्त्र मातृभाषा या बरोबरच चित्रकला आणि संगीत याला म. कर्वेनी पदवी अभ्यासक्रमात मानाचे स्थान दिले होते. तीन वर्षाचा जी. ए. (गृहीतगमा) हा पदवी व पी. ए. (प्रदयेगमा) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम अशी योजना करुन एका जपानी महिला विद्यापीठाच्या धर्तीवर 'भारतवर्णीय महिला विद्यापीठ' हे भारतातील पहिले स्त्रियांचे स्वतंत्र विद्यापीठ म. कर्वे यांनी सुरु केले. (१०)

म. कर्वे यांना जपानचा दैरा झाल्यानंतर आपण केव्हा एकदा महिलांसाठी विद्यापीठ सुरु करतोय असे झाले. अर्थात ३ जून १९१६ रोजी म. कर्वेनी महिला विद्यापीठाची स्थापना पुणे येथे केली. हेच ते हिंगण्याचे महिला विद्यापीठ. सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी जपान मधिल महिला विद्यापीठास भेट दिली त्यावेळी त्यांच्या सोबत म. कर्वेंच्या आश्रमातील सीताबाई अण्णेगिरी होत्या. त्यांच्या बोलण्यातून ठाकरासींना हिंगण्याच्या महिला विद्यापीठाची माहिती कळली. सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी म. कर्वेना सांगितले ठाकरसी आणि पुढे त्यांचे वारस दरसाल विद्यापीठाला रु ५२५००/- निरंतर देत राहतील. त्याच्या बदल्यात हिंगण्याच्या विद्यापीठाचे नांव श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी इंडियन वुईमेन्स युनिव्हर्सिटी असे देण्याचे ठरले. ठाकरसी आणि म. कर्वेमध्ये या सर्व सूचना व अटी पालन करण्याचे ठरले आणि 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ' (एस.एन.डी.टी) सुरु झाले.(११)

ठाकरसींच्या परीस स्पर्शाने आणि म. कर्वे यांच्या अदम्य उत्साहाने संस्थेचे स्वरुप आमुलाग्र बदलले. आता संस्था केवळ विधवा, परित्यक्ता, अनाथ मुलींचे आश्रयस्थान एवढयापुरते मर्यादित न राहता ही संस्था भारताचे आशास्थान असणा-या तरुण स्त्रियांना घडवत आहे, अशा पध्दतीने नावारुपास आली. म. कर्वे यांनी महिलांच्या शिक्षणासाठी अनेक वेगवेगळया गोष्टी जपान मधिल विद्यापीठाच्या आधारावर पुढे वाढवल्या आणि एस.एन.डी.टी विद्यापीठ हे आशियातील पहिले महिला विद्यापीठ अत्यंत यशस्वीपणे कार्यरत झाले. म. कर्वे हे भारतातील विधवांच्या

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

कल्याणासाठी जन्मलेले थोर समाजसुधारक होत. त्यांना या अत्यंत दुर्लक्षित मात्र महत्वाच्या कामासाठी परमेश्वराने शतायुषी देखिल केले. म. कर्वेनी विधवांच्या जीवनासाठी आणि स्त्री शिक्षणवाढीसाठी जे अपार कष्ट घेतले त्याला कोणत्याही बाजूने बरोबरी होईल असे एकही उदाहरण तत्कलीन जीवनामध्ये नाही. म. कर्वे यांनी एक-एक पै गोळा करुन लाखो रुपये उभे केले. पण त्यातला एक नया पैसा देखील स्वत:च्या वैयक्तीक खर्चासाठी वापरला नाही. हे देखील म. कर्वेचे वेगळेपण होय. हिंगण्यातून ठाकरसींच्या घरी येरवडयाला देणगी आणण्यासाठी म. कर्वे जेव्हा जात तेव्हा ते हे १६ कि.मी अंतर चालत जात. कर्वेची किंवा आश्रमाची काय गरज आहे हे पाहिल्यानंतर ठाकरसी त्यांना मदत देत आणि आपल्या आलिशान बग्गीमधून कर्वेना हिंगणे येथे सोडून या असे आपल्या नोकरांना सांगत. मात्र एवढी देणगी आपण दिलेली आहे पुन्हा आपला नोकर आणि बग्गी वापरण्यापेक्षा मी चालतच जाईन असे म कर्वे म्हणत. याचा अत्यंत गौरवास्पद उल्लेख सर विठ्ठलदास ठाकरसींनी देखील केला आहे.(१२)

म. कर्वे विधवांच्या स्थितीबद्दल १२ जून १८८३ मध्ये केसरी मध्ये आलेल्या एका लेखामुळे अत्यंत हेलावून गेले आणि आपला जन्म विधवांच्या कल्याणासाठी आहे हेच आपल्या आयुष्याचे इप्सित आहे असे ठरवून त्याच दिवसापासून म. कर्वेनी विधवांच्या कल्याणाचे काम सुरु केले. समाजाची विधवांबद्दल अत्यंत निर्दयी वागणूक, स्त्री हे फक्त उपभोगाचेच साधन आहे असे मानण्याची प्रवृत्ती पूर्णपणे बदलण्यासाठी म. कर्वेनी विधवाविवाह समाजमान्य झालाच पाहिजे ही कणखर भूमिका घेतली. अशातच कर्वेची बहिण अंबाताई विधवा झाली. त्याचबरोबर कर्वेचे मित्र नरहरपंत यांच्या मोठया बहिणीचे वैधव्य आणि तिच्या केशवपनाचा प्रसंग यामुळे म. कर्वेचे मन दु:खाने व्यापून गेले. हे होत असतानाच म. कर्वे यांची प्रथम पत्नी राधाबाई हिचा मृत्यू झाला आणि म. कर्वेनी आपले आयुष्य विधवा पुर्नविहवासाठी खर्च करायचे ठरवले.(१३)

महाराष्ट्रातील विधवांचे जीवन हे अत्यंत दु:खद आणि वाईट होते. विधवांना घरातदेखील चांगले अन्न, वस्त्र नाकारले जाई. त्यांचे केशवपन करुन तांबडे अलवणाचे वस्त्र नेसून त्यांना एका फळीवर (फळकूट) झोपवले जाई. म. कर्वे यांनी स्वत:ची व मित्राची बहिण या दोघींची अवहेलना प्रत्यक्ष पाहिली होती. याच काळात बंगालमध्ये पं. ईश्वरचंद्र विद्यासागर विधवांना पुनर्विवाह करता यावा यासाठी कार्य करत होते. त्यातून म. कर्वे यांना या कार्याची प्रेरणा मिळाली.(१४) पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी विधवांचा पुनर्विवाह प्रत्यक्ष आचरणात येईल का? या शिर्षकाची २२ पानी पुस्तिका लिहून प्रसिध्द केली.(१५) या पुस्तिकेने कलकत्यामध्ये प्रचंड खळबळ माजली. मात्र सनातन्यांनी ईश्वरचंद्र विद्यासागरांना प्रखर विरोध करायला सुरवात केली. ईश्वरचंद्रांच्या घरावर दगडफेक हल्ले सुरु केले. मात्र पं. ईश्वरचंद्र यांनी न डगमगता आणखी २ पुस्तिका लिहुन आणि त्या पुस्तकांचे इंग्रजीत भाषांतर करुन लेजीस्लेटिव्ह असेंब्लीच्या सभासदामध्ये वाटली. ४ ऑक्टोंबर १८५५ रोजी हजारो सह्यांचा अर्ज कोलकता लेजीस्लेटिव्ह कौन्सिलला एक अर्ज सादर केला अखेर अनेक मतमतांतरे होऊन विरोधकांचे प्रतिविनंती अर्ज येऊन देखील ८ जुलै १८५६ ला कोलकता लेजीस्लेटिव्ह कौन्सिलने ९ जुलै १८५६ रोजी विधवा विवाह मान्यतेचा कायदा पास झाला.(१६) पं. ईश्वरचंद्र विद्यासागरांनी कालीमती या १० वर्षाच्या हिंदू विधवेचा पुनर्विवाह शिरीनचंद्र विद्यारत्न यांच्याशी ७ डिसेंबर १८५६ रोजी घडवून आणला. हा बंगालमधील पहिला विधवा विवाह होता. पं. ईश्वरचंद्रांनी १८६७ पर्यंत स्वत:चे हजारो रुपये खर्च करुन बंगालमध्ये ६० पुनर्विवाह घडवून आणले. पं. ईश्वरचंद्र कर्जबाजारी झाले तेव्हा कलकत्यातील काही दानशूर लोकांनी त्यांना देणग्या देण्याची तयारी दाखवली मात्र पं. ईश्वरचंद्रांनी त्या देणग्या नाकारल्या.

म. कर्वेनी आपणही वरील घटनेची प्रेरणा घेऊन विधवेशी पुनर्विवाह करावा असे मनाशी ठरवले. म कर्वेची पहील पत्नी राधाबाई हिच्या मृत्यूनंतर कर्वे यांचे नातेवाईक त्यांना दुसरे लग्न करण्याचा आग्रह करु लागले. म. कर्वेनी त्यांचे मित्र नरहरपंत यांच्या गोदुबाई या विधवा बहिणीला मागणी घातली आणि हा विवाह निश्चित झाला. पुण्यातल्या सनातनी पुरोहितांनी हे लग्न लावण्याचे नाकारले. मालवणचे पुरोहित वेदमूर्ती वझे यांनी या

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

विवाहाला मान्यता देवून विवाह संपन्न केला. हुंडयाच्या अनिष्ट प्रथेला म. कर्वेनी पूर्णपणे डावलले. ११ मार्च १८९३ रोजी झालेल्या या विवाहाने संपूर्ण महाराष्ट्रात एक प्रचंड वादळ निर्माण झाले. म. कर्वे यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला. एवढेच नव्हे तर म. कर्वे गोदुबाईसह आपल्या कोकणातील मुरुड (कर्द) या गांवी आले तेव्हा सामाजिक बहिष्कारच्या धाकाने कर्वे कुटुंबाने देखील त्यांचे स्वागत केले नाही. (१८)
म. कर्वे यांनी आलेल्या या प्रसंगात आपली आई आणि भाऊ यांची जी अवहेलना झाली त्याचे वर्णन करताना कर्वे म्हणतात 'या पुनर्विवाहामुळ मी प्रियजनांच्या प्रेमाला अंतरलो. कुळाला कलंक लावणारा ठरलो. माझ्यामुळे त्यांना खाली मान घालण्याचा प्रसंग आला.' (१९)
बहुजन समाजाच्या मताविरुध्द मी ही गोष्ट केली आहे. त्याबद्दल मला जो त्रास हाईल तो भोगण्यास मी तयार आहे. समाज जसे वागवेल ती वागणूक मी सहन केली पाहिजे. मात्र मी केलेली ही पुनर्विवाहाची गोष्ट समाजाला, लोकांना आज पटली नाहीतरी उद्या पटेल यासाठी रागावून, भांडून चालणार नाही. लोकमूर्ख आहेत म्हणून शिव्या देऊनही चालणार नाही. म. कर्वेची स्थितप्रज्ञता आणि शांतवृत्ती ही पुढे सजाजाला आपलेच चुकले आहे हे मान्य करायला लावणारी म. कर्वेची कृती ठरली. (२०)
म. कर्वेनी या प्रचंड विरोधाच्या वातावरणात देखील स्त्री शिक्षण आणि विधवा पुनर्विवाहासाठी अधिक योजना सुरु केलेल्या दिसतात. १२ मे १८९४ रोजी विधवा पुनर्विवाहितांचा एक कुटुंबमेळा म. कर्वेनी घेतला आणि विधवा विवाह प्रतिबंध निवारणाची स्थापना केली. म. कर्वेनी समाजाच्या सर्व थरातून प्रखर विरोध होत असूनही म. कर्वेनी विधवाविवाहची चळवळ नेटाने सुरु ठेवली. १८९४ मध्ये म. कर्वे सामाजिक परीषदेसाठी मद्रासला गेले.(२१) तेथे त्यांनी विरेश लिंगम पंतलु यांनी सुरु केलेले विधवागृह पाहिले आणि महाराष्ट्रात आल्यानंतर पंतलुंच्या आधारावर विधवा विवाहाबरोबर विधवा शिक्षणाचे कामही म. कर्वे यांनी सुरु केले. म. कर्वेनी असे ठरवले पुनर्विवाहाच्या प्रश्नांशी झगडत राहून जितक्या विधवांना कष्टातून बाहेर काढता येईल त्यापेक्षा विधवांना शिक्षण देऊन सामाजिक त्रासातून अधिक प्रमाणात मुक्त करता येईल असा विचार म. कर्वेनी केला.(२२) कारण सर्व सनातन्यांचा विधवा पुनर्विवाहाला धार्मिक बाब म्हणून विरोध होता मात्र विधवांच्या शिक्षणाला ते ही महिला विद्यापीठाला असा विरोध करणे सनातन्यांना शक्यच होणार नाही हे म. कर्वेनी ओळखले आणि विधवा शिक्षणाचे कार्य मोठया प्रमाणात सुरु केले. म. कर्वेनी १४ जून १९८६ रोजी अनाथ बालिकाश्रमाची स्थापना केली.(२३) या संस्थेचे पहिले अध्यक्ष सर रामकृष्ण पंत भांडारकर होते. यानंतर ते संस्था चिटणीस झाले. या संस्थेच्या मदतीसाठी म कर्वेनी उन्हातान्हात, पावसापाण्यात, थंडीवा-यात घरोघरी चालत जावून पै-पै करुन खुप पैसे जमवले. कर्वेनी स्वत:ची १००० रुपयाची शिल्लक आणि ५००० रु. ची विमा पॉलीसी देखील आश्रमास अर्पण केली. १८९७-९८ या वर्षात पुण्यात प्लेगची साथ सुरु झाली. लोक पुणे सोडुन बाहेर जावू लागले. अनाथ बालिकाश्रम देखील पहिल्यांदा रा. ब. गणेश गोविंद गोखले यांच्या बंगल्यात आणि पुढे गोखले यांनीच हिंगणे बुद्रुक (कर्वेनगर) येथे स्वत:ची ६ एकर जागा आश्रमला दिली आणि ५०० रु खर्च करुन छोटी झोपडी देखील बांधून दिली.(२४) हिंगण्याची ही जागा माळरानावर अत्यंत दुर मनुष्यवस्तीपासून ख-या अर्थाने दूर असलीतरी याच झोपडीत म. कर्वेनी बालविधवांच्या जीवनात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचे काम यशस्वी केले. हिंगण्याच्या निर्जन, खडकाळ, काट्याकुट्याच्या माळावर स्त्री शिक्षणाचे आणि विधवा कल्याणाचे बीज पेरले गेले.(२५)
म. कर्वे दिवभर फर्ग्युसन कॉलेजात अध्यापनाचे काम करुन सायंकाळी हिंगण्याला परत यायचे. रात्री मुलींना शिकवायचे, मुलींच्या सोयी-गैरसोयी यांची चौकशी करुन त्यांची व्यवस्था कराचची व सकाळी पुन्हा पुण्याची वाट धरायची. म. कर्वे या काळात त्यांना मदत करणा-या दोन नातेवाईक विधवा स्त्रियांच्या अत्यंत गौरवाने उल्लेख करतात. श्रीमती नर्मदाबाई फडके व श्रीमती पार्वतीबाई आठवले या दोघींनी प्रचंड कष्ट घेऊन आश्रमाचे काम त्यावेळी चालवले म. कर्वेनी स्वत:ची पत्नी बाया ऊर्फ आनंदबाई यांना मात्र लोकप्रवाद नको म्हणून आश्रमाच्या कामापासून अगदीच दूर

ठेवले होते मात्र बाया कर्वे यांची सर्वच कामामध्ये खूप मदत होत असे. (२६) बाया कर्वे रोज शहरातून धान्य आणून स्वच्छ करुन दळण्यासाठी म. कर्वे यांच्याकडे देत असत. त्या आणि इतर कोणत्याही कामात बाया कर्वे यांनी कधीच का-कू केले नाही. बाया कर्वे या अत्यंत निग्रही, स्वाभिमानी, करारी अन कर्तबगार होत्या. त्या अत्यंत संसार दक्ष आणि काटकसरी होत्या. त्यांचे बोलणे स्पष्ट, परखड, दुस-याला बोचणारे वाटे पण त्यात स्वार्थाचा लवलेशही नसे. म. कर्वे यांना अगणित कन्यांचे धर्मपिता असा सन्मान मिळाला. त्या कन्यांचे मातृपद बाया कर्वे (आनंदीबाई) यांनी सांभाळले. बायानी म. कर्वे यांचे सोबत विधवा जगाचा संसार करताना फार सोसले. हे सारे सोसणे बायानी 'माझे पुराण' या आत्मचरित्रामध्ये शब्दबध्द केले आहे. म. कर्वे यांच्या विवाहानंतर बायाने घेतलेले नाव 'सदनाचे उपकार मजवर झाले फार, आनंदीने फेडायला असावे तयार' बायाच्या जबाबदारीची, कवी मनाची साक्ष आहे. बाया म्हणायची, 'मी पूजा अर्चा कधी केली नाही, देवळात गेली नाही, माझा धर्म म्हणजे पंडिता रमाबाईंनी शिकवलेला, अनाथ अपंगांना वाट दाखविण्याचा, अडल्या नडलेल्यांना मदत करण्याचा, तो मी पाळत असते.' (२८)

म. कर्वे अहोरात्र विधवांच्या जीवनात आनंद कसा निर्माण होईल, समाज विरोध कसा कमी होईल यासाठी नव-नवीन योजना राबविण्यात मग्न असत. म. कर्वे यांचा विधवा आश्रम/ वा विधवांचे वसतीगृह ही एक सामाजिक प्रयोगशाळाच होती. म. कर्वे यांच्या या आश्रमात महिन्यातून एकदा सर्व विधवांचे केशवपन करण्यासाठी नाभिक येत असे. बाहेर केशवपन सक्तीचे होत. कर्वे विधवा आश्रमात/वसतीगृहामध्ये वृत्ती स्वातंत्र्य होते. एकदा मासिक केशवपनास सीताबाई नावाच्या महिलेने नकार दिला. पार्वतीबाईंनी म. कर्वेकडे या बाबत तक्रार केली. म. कर्वे म्हणाले, 'विधवांनी केशसंभार ठेवणे यात काही समाजबाह्य नाही किंवा नीतिबाहय नाही.'(२९) या पार्वतीबाई बाया कर्वेची विधवा बहिण, पुढे इंग्रजी शिकल्या, निधी संकलनासाठी अमेरिकेला गेल्या, पुढे स्वत:चा केशसंभार उत्तम वाढवला, जपला. त्यांनी इंग्रजी भाषेत उत्तम आत्मचरित्र लिहिले. म. कर्वे यांनी दिलेल्या शिक्षणांनी विधवांना फक्त अर्थाजर्नाचा मार्ग दाखवला नाही तर त्यांना जगण्याची उर्मी दिली. पार्वतीबाई आठवले म्हणतात, 'शिक्षणामुळे माझा नवीन जन्म झाला व त्या जन्मामुळे माझे ज्ञानक्षेत्र वाढून माझी मतांतरे फार झपाटयाने होत चालली.'(३०) पार्वतीबाई आठवलेंनी अमेरिकेतुन खुप मोठी देणगी आणली. म. कर्वे यांनी त्या देणगीचा, 'अमेरिकन स्कॉलर शिप फंड' निर्माण केला.(३१) म. कर्वे म्हणतात, 'पार्वतीबाईंचे आयुष्य म्हणजे एक कादंबरीच आहे.' पार्वती बाईंच्या बरोबरीने म. कर्वेना श्रीमती वेणूताई नामजोशी, काशीबाई देवधर, यमुनाबाई साने, कमलाबाई गरुड, रमाबाई सोमण, सीताबाई अण्णेगिरी अशा अनेक थोर स्त्री कार्यकर्त्यांनी आजन्म सेविका होऊन विधवा आश्रमाचे/वसतीगृहाची आजन्म सेवा केली.(३२)

म. कर्वे यांनी विधवा केशवपनास विरोध करायला सुरुवात केली. कर्वे याला समाज दौर्बल्य मानत. त्यांनी आपल्या आश्रमातील विधवांना केसवाढवण्यास परवानगी दिली. समाज विरोधात होताच पण कर्वे यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. सनातनी कर्वे यांना धर्मबुडवे म्हणत. त्याकडेही म. कर्वेनी दुर्लक्ष केले. हळू हळू परिस्थिती बदलली, कर्वे यांचे कार्य समाजाच्या पचनी पडू लागले. कर्वे यांच्या या विधवाश्रमाला मोठी-मोठी माणसे भेट देऊ लागली, देणग्या देऊ लागली. म. कर्वे यांच्या कार्याचा देशभर आणि परदेशातही बोलबाला झाला. इ.स. १९०४ मध्ये बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी विधवाश्रमास भेट दिली. मुलींच्या अभ्यासाची चाचणी घेतली. मुलींना उपदेश करताना महाराज म्हणाले, 'तुम्हाला समाजाकडून होणारा त्रास हेतू परस्सपर नव्हे ते हजारो वर्षांच्या सामाजिक समजुतीचा परिणाम आहे. या त्रासाला झिडकारण्यासाठी सन्मानानी आवश्यक ते सर्व करा.'(३३) महात्मा गांधी आणि कस्तुरबा गांधी यांनी १९१५ मध्ये आश्रमाला भेट दिली. चार तास देऊन संस्थेची पाहणी केली, आणि मुलींना उपदेश केला. या सोबतच अनेक महनीय व्यक्तींनी आश्रमाला भेट दिली होती. साह्य दिले होते. म. कर्वे यांच्या कार्याची दखल देशभरात घेतली जाऊ लागली होती आणि मोठ्या लोकांचे पाठबळही मिळू लागले होते. या संस्थेला डॉ. सर रामकृष्णपंत

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

भांडारकर, न्या. रानडे, नामदार गोपाळकृष्ण गोखले, सदाशिव मोरेश्वर देव इ. महनीयांचे पाठबळ मिळाले होती.(३४)

म. कर्वे यांनी ख-या अर्थानी हजारो विधवा महिलांच्या आयुष्यात जगण्याची इच्छा निर्माण केली. त्या विधवांना शिक्षण देऊन अर्थार्जन करण्यासाठी तयार केले. याचा परिणाम संपूर्ण समाजात विधवांकडे पाहण्याचा निकोप दृष्टिकोन निर्माण करण्यात म. कर्वे यशस्वी झाले असे म्हटल्यास वावगे ठरु नये. दोन-तीन उदाहरणे पाहिली तर हे लक्षात येऊ शकेल. पार्वतीबाई आठवले ही बाया कर्वे यांची बहिण, म. कर्वे यांची मेहूणी ती आश्रमात आली तेव्हा पासून अंगमेहनत, स्वयंपात इतर कामे करण्यास तयार होती. मात्र म. कर्वे यांनी तिला शिकविले, पुढे इंग्रजी शिकविले आणि तिला विधवाश्रमासाठी देणगी गोळा करण्यासाठी अमेरिकेत ही पाठवले. पार्वतीबाई आठवलेंनी भरपूर देणगी आपली. म. कर्वे यांनी त्या पैशातून 'अमेरिकन स्कॉलरशिप फंड' स्थापन केला. त्या व्दारे हजारो विधवांना शिकून स्वत:च्या पायावर उभे राहता आले.(३५) जगण्याची इच्छा नसणा-या पार्वतीबाईंनी पुढे विधवा उध्दारासाठी प्रचंड मोठे काम उभे केले हे केवळ म. कर्वे यांच्या कार्याचे मोठेपण आहे.

दुसरे उदाहरण पाहूया सीताबाई आणि अण्णिगेरी यांचे सीताबाईंचे लग्न १० व्या वर्षी झाले. वडिलांचे लगेचच निधन झाले. सासरी गेल्या आणि केवळ पाचव्या महिन्यात वैधव्य प्राप्त झाले. सीताबाईय म. कर्वे यांच्या आश्रमात आल्या. त्यांनी धारवाड-पुणे प्रवास बाकाखाली लपून केला. १३ व्या वर्षी आश्रमात आलेल्या सीताबाईंनी प्रथम मराठी शिकून घेतले. त्यांना मराठी शिकवण्याचे काम शंतनुराव किर्लोस्कर यांच्या आत्याबाई दुर्गाबाई किर्लोस्कर आणि श्रीमती मथुराबाई उचगावकर यांनी केले. पुढे सीताबाई मॅट्रिक झाल्या, एस.एन.डी.टी विद्यापीठाच्या पदवीधर झाल्या(१९२२), संस्थेच्या शाळेत मुख्याध्यापक बनल्या.(३६)

अशाप्रकारे म. कर्वे यांनी हजारो महिलांच्या जीवनात आनंदाचे क्षण प्राप्त करुन दिले. म. कर्वे यांनी विधवा उध्दार विषयक कार्य हा विषय खरे तर इतका मोठा आहे की त्यावर दोन–चार विद्यावाचस्पती पदवींचे काम होऊ शकेल. मात्र इथे मी माझ्या छोटया शोधनिंबंधामध्ये म. कर्वे यांनी केलेल्या विधवा उध्दार विषयक कार्याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ**

१. डॉ. जोशी न. म., महाराष्ट्राचे शिल्पकार धोंडो केशव कर्वे, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई , प्रथम – डिसेंबर २००३, पृ .४

२. खोचीकर वि. शि., (संपादक)ए 'जिल्हा स्त्री शिक्षणाची वाटचाल आणि सार्वत्रिक शिक्षण, पुणे' परिसराला ख्रिस्ती समाजातील स्त्रियांचे शैक्षणिक योगदान (१८७६-१९५०), लो. सौ. प्रतिभा धडफळे, भारतीय इतिहास संकलन समिती, पुणे प्रथम आवृत्ती २१ ऑगस्ट २००७, पृ. क्र. १५४

३. टिकेकर अरुण (संपादक), 'शहर पुणे एक सांस्कृतिक संचिताचा मागोवा' खंड-दुसरा, पुणे शहरातील शिक्षण संस्था, प्र. ल. गावडे, निळुभाऊ लिमये फौंडेशन, पुणे, पहिली आवृत्ती, ४ जून २०००, पृ. क्र. २१८

४. महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, 'गाथा शतकाची', महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे, प्रथम आवृत्ती, ११ एप्रिल २००८, पृ. क्र. ३२.

५. सोमवंशी शं. ग., 'महाराष्ट्रातील थोर शिक्षण महर्षी व समाजसेवक', हायवे प्रिंटर्स, पुणे, - १२ पहिली आवृत्ती, १९८६ पृ. क्र. ३२

६. शिखरे दा. न., 'भारत रत्न महर्षी' आण्णासाहेब कर्वे, चित्रशाळा प्रकाशन, पुणे-२, प्रथमावृत्ती १८ एप्रिल १९५८, पृ. क्र. ३९.

७. उपरोक्त, पृ ४१

८. कर्वे धोंगडे केशव'आत्मवृत्त व चरित्र', धो. के. कर्वे, ना. म. पटवर्धन हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, प्रथमावृत्ती १९५८, पृ. क्र. ३७५

९. डॉ. धोगडी अश्विनी, 'स्त्री शिक्षणाचा पाया घालणारे शहर', दै. सकाळ, १ जानेवारी २००६, पृ. ६

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

१०. उपरोक्त – पृ. ३७६

११. आठलेकर मंगला, 'महर्षी ते गौरी', स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल, राजहंस प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९९१, पृ. क्र. ४१

१२. उपरोक्त – पृ. ४३

१३. धोंडो केशव कर्वे, 'आत्मवृत्त व चरित्र', उपोद्घात – रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे, प्रथमावृत्ती १९५८, पृ. क्र. २४

१४. डॉ. गोखले म. वि., 'निवडक चरित्रे भाग - १', ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट २००८, पृ.क्र. ११९

१५. उपरोक्त पृ. क्र – २५

१६. उपरोक्त पृ. क्र. १२०

१७. डॉ. गोखले म.वि – उपरोक्त पृ. २६

१८. उपरोक्त पृ. क्र. १२०

१९. डॉ. गोखले म. वि. – उपरोक्त पृ. क्र. २५

२०. धोंडो केशव कर्वे – पृ. क्र. २६

२१. उपरोक्त – पृ. क्र. २६

२२. प्रा. नांदुर्डीकर ना. द., 'शिक्षण तत्ववेत्ते', जयंत आणि कंपनी, नवी पेठ, पुणे-३०, प्रथमावृत्ती ५ जानेवारी १९५४, पृ क्र. ५०

२३. उपरोक्त – पृ. क्र. ५१

२४. उपरोक्त – पृ. क्र. ५०

२५. सौ. चाफेकर सुधा, 'मराठी कन्यांचा कल्पवृक्ष', महर्षी धोंडो केशव कर्वे, चंद्रकला प्रकाशन, पुणे-११, प्रथमावृत्ती डिसेंबर १९९५, पृ. क्र. ४४

२६. स्त्री जीवनविषयक स्थित्यंतर पुणे परिसर – भाग -१ (इ.स. १८७६ ते १९५०), भारतीय इतिहास संकलन समिती, प्रकाशन विभाग, पुणे १९८९, पृ. क्र. १५

२७. उपरोक्त पृ. क्र. – १२

२८. सौ. देशपांडे मालती, 'स्त्री शिक्षणाचे प्रणेते- महर्षी कर्वे', महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कर्वे नगर, पुणे-५२, प्रथमावृत्ती १९९७, पृ. क्र. १

२९. प्राचार्य भोसले शिवाजीराव, दीपस्तंभ चरित्रवनातील आनंद यात्रा, अक्षरब्रम्ह प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९४, पृ. क्र. १२५

३०. रानडे प्रतिभा, 'स्त्री प्रश्नांची चर्चा एकोणिसावे शतक', पद्मगंधा प्रकाशन पुणे-३८, प्रथमावृत्ती, मार्च १९९१, पृ. क्र. ३१

३१. जोगळेकर मृणालिनी, 'स्त्री मुक्तीच्या उदगात्या', स्वाती प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती ऑगस्ट १९९८, पृ. क्र. १०४

३२. प्रायार्य भोसले, उपरोक्त – पृ. क्र. १२५

३३. रानडे प्रतिभा – उपरोक्त पृ. क्र. ३२

३४. आठलेकर मंगला – उपरोक्त पृ. क्र. ४३

३५. प्राचार्य भोसले – उपरोक्त – पृ. क्र. १२६

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

३६. डॉ. सोमवंशी शं. ग. – उपरोक्त पृ क्र. ३४

**Cite This Article:**
डॉ. दीपक गोविंद देशपांडे, *(2022).* **महर्षी कर्वे यांनी केलेले विधवा उध्दार विषयक कार्य,** ***Electronic International Interdisciplinary Research Journal****, XI (III) May-June, 43-51.*